दि उमरेर ॲकॅडेमी ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्सेस् उमरेड

द्वारा संचालित

(स्थापना २०००)

# महिला कला महाविद्यालय, उमरेड
# जि. नागपूर

(नॅक नामांकन प्राप्त)

## (कला शाखा)




# माहिती पत्रक


बुधवारी पेठ, उमरेड जि. नागपूर

☎: 07116-244243.

mahilakalamahavidyalay@gmail.com www.mkmumred.org

# ॥ विद्यापीठ गीत ॥

या भारतात बंधुभाव नित्य वसू दे ।
दे वरचि असा दे।
हे सर्व पंथ-संप्रदाय एक दिसू दे।
मतभेद नसू दे ॥ धृ॥

नांदोत सुखे गरिब-अमिर एकमतानी।
मग हिंदु असो, ख्रिश्चन, वा हो इस्लामी।
'स्वातंत्र्यसुखा' या सकलांमाजि वसू दे।
दे वरचि असा दे ॥१॥

सकळास कळो, 'मानवता, राष्ट्रभावना'।
हो सर्वस्थळी मिळुनि 'समुदाय-प्रार्थना'।
उद्योगि तरुण वीर, शीलवान दिसू दे।
दे वरचि असा दे ॥२॥

हा जातिभाव विसरूनिया एक हो आम्ही।
अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातुनी।
खळ-निंदका-मनीहि 'सत्य-न्याय' वसू दे।
दे वरचि असा दे॥३॥

सौंदर्य रमो घरघरांत स्वर्गियापरी।
ही नष्ट होऊ दे विपत्ति, भीति बोहरी।
तुकड्यास सदासर्वदा सेवेत कसू दे।
दे वरचि असा दे॥४॥



- वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

# Career Katta Activities



















# N.S.S. Activities























प्रिय,

विद्यार्थिनी व पालक,

आपल्या सर्वांचे आमच्या महाविद्यालयामध्ये मन:पूर्वक स्वागत आहे.

आमचे महाविद्यालय गुणवत्तापूर्ण शिक्षण, सर्वांगीण विकास आणि उत्कृष्ट मूल्यसंस्कार यासाठी कटिबद्ध आहे. आमचे महाविद्यालय उमरेड तालुक्यामध्ये महिलांसाठी एकमेव शैक्षणिक संस्था असून विद्यार्थिनींच्या बौद्धिक, सामाजिक आणि नैतिक विकासाला प्रोत्साहन देणे हे आमचे प्रमुख ध्येय आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, अनुभवी प्राध्यापकवर्ग आणि समृद्ध शैक्षणिक वातावरण यामुळे विद्यार्थिनींचे उज्ज्वल भवितव्य घडविण्यास आम्ही सक्षम आहोत.

शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच क्रीडा, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांमध्येही विद्यार्थिनींना सहभागी होण्याची संधी दिली जाते, ज्यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो. आम्ही विद्यार्थिनींना केवळ ज्ञान देण्यावर नव्हे, तर त्यांना जबाबदार, संवेदनशील आणि प्रगत नागरिक बनविण्यावर भर देतो. आपण आमच्या महाविद्यालयाचा भाग होऊन आपल्या उज्ज्वल भवितव्याची पायाभरणी कराल, असा आम्हाला विश्वास आहे.

आपल्या यशस्वी भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा!

**प्रा.डॉ. सरला मेश्राम**
कार्यकारी प्राचार्या
महिला कला महाविद्यालय, उमरेड

दि उमरेर ॲकॅडेमी ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्सेस् उमरेड
द्वारा संचालित

# महिला कला महाविद्यालय, उमरेड जि. नागपूर

(नॅक नामांकन प्राप्त)

## (कला शाखा)

### - दूरदृष्टी (व्हिजन) -

महिला सशक्तीकरण, सामाजिक न्याय आणि राष्ट्र निर्माणासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रदान करणे.

### - ध्येय (मिशन) -

उत्कृष्टता प्राप्त करणे, विद्यार्थिनींना आत्मनिर्भर बनविणे आणि सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण करणे.

### -उद्दिष्टये -

- विद्यार्थिनींना डिजिटल सेवा सुविधा पुरविणे.
- विद्यार्थिनींना गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रदान करणे.
- विद्यार्थिनींचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास करणे.
- विद्यार्थिनीमध्ये सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण करणे.
- ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना शिक्षणाची उपलब्धता प्राप्त करून देणे.
- स्पर्धा परीक्षा, करिअर कट्टा, कौशल्य आधारित उपक्रम आदी शिक्षणाची उपलब्धता करून देणे.



दि उमरेर ॲकॅडेमी ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्सेस् उमरेड

द्वारा संचालित

(स्थापना –इ.स.२०००)

# महिला कला महाविद्यालय, उमरेड

(केवळ मुलींकरिता)

नॅक नामांकन प्राप्त

## (कला शाखा)

# माहिती पत्रक



बुधवारी पेठ, उमरेड जि. नागपूर

☎: 07116-244243.

mahilakalamahavidyalay@gmail.com www.mkmumred.org

## आपले राष्ट्रगीत

जन–गण–मन अधिनायक, जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंध, गुजरात, मराठा
द्राविड़–उत्कल–वंग ।
विंध्य हिमाचल यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग ।
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिष मागे,
गाहे तव जय गाथा ।
जन–गण–मंगलदायक, जय हे, भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे, जय जय जय, जय हे ।।



**–रवींद्रनाथ टागोर**

## महिला कला महाविद्यालयाची प्रतिज्ञा

मी महिला कला महाविद्यालयाची विद्यार्थिनी या नात्याने अंतःकरणपूर्वक निर्धार करते की, नियमित अध्ययन, महाविद्यालयीन शिस्त, सहकार्य, स्नेहभाव आणि सुसंस्कृत वागणूक हे गुण अंगी बाळगून संस्थेची प्रतिष्ठा व लौकिक वाढविण्यास सदैव प्रयत्नशील राहील.

त्याचप्रमाणे समाजातील पद–दलित व शोषित जनतेची जाणीव अंतःकरणात सदैव ठेवून त्यांच्या सेवेसाठी व उत्थानासाठी मनःपूर्वक हातभार लावीन.

# वन्दे मातरम

वंदे मातरम ।
सुजलां सुफलां मलयजशीतलाम्
शस्यश्यामलाम मातरम ।
शुभ्रज्योत्स्ना पुलकीतयामीनीम्
पुल्लकुसुमित द्रुमदलशोभिनीम्
सुहासिनी सुमधुर भाषिनीम्
सुखदा वरदां मातरम्।।
कोटी कोटी कन्ठ कलकलनिनाद कराले
कोटी कोटी भुजैधृत खरकरवाले
के बोले मा तुमि अबले
बहुबलधारिणीं नमामि तारिणीम्
रिपुदलवारिणीं मातरम् ।।
तुमी विद्या तुमी धर्म, तुमी हृदि तुमि मर्म
त्वं हि प्राणाः शरीरे
बाहुते तुमि मा शक्ति,
हृदये तुमि मा भक्ति,
तोमारे प्रतिमा गडी मंदिरे मंदिरे...... वन्दे मातरम् ।।
त्वं हि दुर्गा दशप्रहरणधारिणी
कमला कमलदल विहारिणी
वाणी विद्यादायिनी, नमामि त्वाम्
नमामि कमलां अमलाम् अतुलाम्
सुजलां सुफलां मातरम्...... वन्दे मातरम् ।।

– **बंकिमचंद्र चॅटर्जी**

# * पसायदान *

आता विश्वात्मके देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ।।१।।
जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भूता परस्परे पडो । मैत्र जीवांचे ।।२।।
दुरीतांचे तिमीर जावो । विश्व स्वधर्म सूर्य पाहो ।
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ।।३।।
वर्षत सकळमंडळी, ईश्वर निष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतु भुतां ।।४।।
चलां कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामनीचे गांव ।
बोलते जे अर्णव । पीयुषाचे ।।५।।
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वाही सदा सज्जन । सोयरे होतु ।।६।।
किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होवुनी तिहीं लोकीं ।
भजिजो आदि पुरूखी । अखंडीत ।।७।।
आणि ग्रंथोपजीविये । विशेषी लोकीं इयें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवें जी ।।८।।
येथ म्हणे श्री विश्वेश्वरावो । हा होईल दान पसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ।।९।।

**- संत ज्ञानेश्वर**
**(ज्ञानेश्वरी - अध्याय १८)**

# महाविद्यालयाचे ध्येय व उद्दिष्टे

१) उमरेड परिसरातील व ग्रामीण विभागातील मुलींना शिक्षणासाठी स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध करूण देणे.

२) कला शाखेतून समाजाशी संबंधित अद्यावत ज्ञान विद्यार्थिनींना देणे.

३) विद्यार्थिनींचे चारित्र्य व व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रयत्न करणे तसेच पालक व इतर जबाबदार नागरिकांकडून सहकार्य करणे.

४) विद्यार्थिनींमध्ये शिस्त, सामाजिक दायित्व, राष्ट्रीय एकात्मता आणि बंधूभाव इत्यादी मूल्ये अंगी बाळगणे.

५) विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासाकरीता काळानुरूप आवश्यक त्या सोयी महाविद्यालयात उपलब्ध करून देणे.

उदा. संगणक प्रशिक्षण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, इंग्रजी संभाषण वर्ग, पर्यावरण जागृती, समाजाभिमुखता, विवेकनिष्ठता, विज्ञाननिष्ठता इत्यादी मूल्यांची पायाभरणी.

६) महाविद्यालय परिसरात अध्ययन, अध्यापन आणि संशोधन कार्य शांततापूर्ण वातावरणात चालण्यासाठी संधी व सामग्री उपलब्ध करूण देणे.

७) विद्यार्थिनींमध्ये राष्ट्रीय ध्येय आणि आकांक्षा या विषयी जाणीव निर्माण करणे आणि भविष्यातील जबाबदार नागरिकत्वाची क्षमता निर्माण करणे.

८) विविध खेळ आणि स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थिनींमधील सुप्त कला गुणांचा विकास करण्याचा प्रयत्न करणे, नेतृत्व गुण, वक्तृत्व गुण, समाजभान, कला अभिरुची, सौंदर्यभिमुखता या गुणांचा विकास घडवून आणणे.

९) पर्यावरण रक्षण, वृक्षसंवर्धन, जलसंधारण (Rain Water Harvesting) इ. गोष्टी काळजीपूर्वक बिंबविणे.

## सूचना :-

महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना सूचित करण्यात येते की, सत्र २०२६–२०२७ करिता विभागातील पदवी प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाचे अभ्यासक्रम हे रा.तु.म. नागपूर विद्यापीठ नुसार राहतील.

सर्व विद्यार्थिनींना/प्रवेशार्थी विद्यार्थिनींना सूचित करण्यात येते की, विद्यापीठाचे नामांकन व परीक्षा फॉर्म भरणे हे ऑनलाईन केले असल्यामुळे निर्धारित केलेल्या कालावधीत विद्यार्थिनींनी नामांकन अर्ज व परीक्षा फॉर्म भरणे अनिवार्य राहील त्यात काही चुका झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थीनींची राहील.

तसेच शासनाच्या निर्देशानुसार शिष्यवृत्ती फॉर्म सुध्दा ऑनलाईन भरावयाचे आहे. शासनाने दिलेल्या तारखेच्या आत फॉर्म भरणे अनिवार्य आहे. फॉर्म स्वतः विद्यार्थिनींने भरावयाचे असून त्यातील माहिती ही खरी असावी, चुकीची माहिती दिल्यास व शिष्यवृत्ती फॉर्म रद्द झाल्यास विद्यार्थिनींना पूर्ण फी, परीक्षा प्रवेश पत्र मिळण्यापूर्वी भरावे लागेल.

### विशेष सूचना :-

१) महाविद्यालयात वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात येतात.

२) विद्यापीठ प्रतिनिधीची निवडणूक विद्यापीठांच्या परिपत्रकानुसार अथवा प्राचार्याच्या सूचनेनुसार घेण्यात येईल/विद्यापीठाच्या वेळोवेळी सूचनेनुसार छात्रसंघाची निवडणूक घेण्यात येईल.

### पालक संपर्क विभाग :-

महाविद्यालयाच्या विकासाच्या दृष्टीने पालक वर्गाशी संपर्क साधून त्यांच्याशी चर्चा करण्याचा दृष्टिकोनातून पालक संपर्क विभागाची स्थापना करण्यात आली. यामध्ये पालक वर्गाची अपेक्षा आणि अडचणी लक्षात घेतल्या जात असतात. शिक्षक आणि पालक यांच्या भेटीसाठी मेळाव्याचे आयोजन केले जाते. पालक आणि शिक्षक यांच्यातील चर्चा विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने होत असतात.

### पौढ शिक्षण :-

रा.तु.म. नागपूर विद्यापीठ च्या माध्यमातून निरंतर व प्रौढ शिक्षण विस्तार विभागाच्या अंतर्गत महाविद्यालय लोकसंख्या शिक्षण मंडळ स्थापन केले आहे. महाविद्यालया सभोवतीच्या परिसरातील जनसमुदायाला वाढत्या लोकसंख्येमुळे कुटुंबावर आणि देशावर होणाऱ्या परिणामाविषयी माहिती देणे. या मंडळात सहभागी विद्यार्थिनींनी वर्षभरात आयोजित विविध

दि उमरेर ॲकॅडेमी ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्सेस् उमरेड, द्वारा संचालित

# महिला कला महाविद्यालय, उमरेड

उमरेड सभोवतीच्या दुर्गम ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना अद्ययावत उच्च शिक्षण मिळण्याच्या उद्देशाने संस्थेने अथक परिश्रम घेऊन उमरेड येथे महिला कला महाविद्यालयाची स्थापना सन २००० साली केली.

विविध अभ्यासक्रम, विविध विस्तार कार्य, सामाजिक कार्य, सांस्कृतिक अभियानात महाविद्यालयाचा सहभाग, आत्मियता व सेवाभावी वृत्तीचे शिक्षण या वैशिष्टयांमुळे महाविद्यालयाने संपूर्ण उमरेड परिसरात एक वेगळे स्थान प्राप्त केले आहे.

**महाविद्यालयाची ठळक वैशिष्टये :-**

१) उच्चशिक्षित व अनुभवी प्राध्यापक वृंद
२) महाविद्यालयाची प्रशस्त इमारत व विस्तीर्ण परिसर
३) विद्यार्थिनींच्या हितासाठी झटणारे प्राध्यापक व कर्मचारी वृंद
४) विद्यार्थिनींच्या इतर कला गुणांना वाव देण्याचा उद्देशाने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन
५) अतिरिक्त वर्ग घेऊन विद्यार्थिनींना विशेष मार्गदर्शन करण्याची सोय
६) स्पर्धा परिक्षेच्या पूर्वतयारीसाठी मार्गदर्शन
७) विद्यार्थिनींच्या तक्रारी/अडचणी दूर करण्यासाठी प्राध्यापक वृंद सतत प्रयत्नशील.
८) विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी राबविल्या जाणाऱ्या योजना राष्ट्रीय सेवा योजना, महिला समूह, सांस्कृतिक विभाग, क्रीडा विभाग, रोजगार मार्गदर्शन केंद्र इत्यादी
९) दर वर्षाला शैक्षणिक सहलीचे आयोजन
१०) विद्यार्थिनींना शैक्षणिक सत्राकरिता क्रमिक पाठ्यपुस्तके उपलब्ध
११) ग्रंथालय व स्वतंत्र वाचनकक्ष
१२) विविध विषयाबद्दलच्या अधिक माहितीकरिता विषयतज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शनाची सोय.
१३) शासनाच्या सर्व प्रकारच्या शिष्यवृत्त्या उपलब्ध
१४) डिजिटल क्लास रुम उपलब्ध
१५) कॉम्प्युटर क्लास लॅब व कॉम्प्युटर प्रशिक्षणाची सोय
१६) कौशल्य विकास मार्गदर्शन
१७) स्वयंरोजगार मार्गदर्शन व प्रशिक्षण केंद्र
१८) ऑनलाईन क्लासची व्यवस्था.
१९) व्हरच्युअल क्लासेसची व्यवस्था
२०) योगा व मेडीटेशन सेंटर
२१) करिअर कट्टा व स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र

परिणामाविषयी माहिती देणे. या मंडळात सहभागी विद्यार्थिनींनी वर्षभरात आयोजित विविध कार्यक्रमामंध्ये सक्रिय सहभाग घेतात या कार्यावर आधारित विद्यार्थिनींना १० पैकी प्रोत्साहनपर गुणांची तरतुद आहे.

**पर्यावरण व वृक्ष संवर्धन मंडळ ः-**

विद्यार्थिनींना पर्यावरण व वृक्ष संवर्धन विषयाची माहिती देऊन त्यांना कार्यप्रवण करण्याच्या हेतूने महाविद्यालयात पर्यावरण व वृक्ष संवर्धन विभागाची स्थापना करण्यात आली आहे. या मंडळाच्या माध्यमातून वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करणे, प्लास्टिक पिशवी निर्मूलन कार्यक्रम राबविणे. आदि उद्दिष्टे लक्षात घेवून विद्यार्थिनींना कार्यक्रमात सहभागी करून घेतल्या जाते.

**महिला समूह तथा महिला समित्यांची स्थापना ः-**

महिला हक्काच्या सुरक्षिततेसाठी महिलांच्या सबलीकरणासाठी आणि विकासासाठी समाजातील वेगवेगळ्या पातळ्यावरून भरीव प्रयत्न होत आहेत. त्या दृष्टीने एक पाऊल म्हणून महाविद्यालयात महिला कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

**उद्दिष्टे ः-**

१) महाविद्यालयात मुलींना सुरक्षित वाटावे.

२) महाविद्यालयातील कार्यक्रमांमध्ये मुलींचा कृतीशिल सहभाग वाढावा.

३) मुलींना करियर विषयक, भावनिक, कौटुंबिक, आरोग्य विषयक प्रश्नासंबंधी सहाय्य करण्यासाठी समुपदेशन सेवा उपलब्ध करणे.

४) मुलींची कुठल्याही बाबतीत मानसिक कुचंबना होणार नाही याची दक्षता घेणे.

# आचार संहिता

१) महाविद्यालयाच्या आवारात व आवराबाहेर महाविद्यालयाच्या शिस्तीला व व्यवस्थेला बाधक होईल असे वर्तन विद्यार्थिनींच्या हातून घडता कामा नये.

२) महाविद्यालयातील कार्यक्रम, स्वातंत्र्यदिन व गणराज्य दिनासारख्या राष्ट्रीय उत्सवाप्रसंगी सर्वांची उपस्थिती आवश्यक आहे. अनुपस्थित राहणाऱ्यांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. कार्यक्रम व समारंभ प्रसंगी पांढरा गणवेश परिधान करून आले पाहिजे.

३) प्राचार्य, प्राध्यापक व महाविद्यालयात येणारे पाहुणे व नागरिक यांचा आदर राखणे हे प्रत्येकाचे आद्य कर्तव्य आहे.

४) प्राध्यापक वर्गात जाण्यापूर्वी विद्यार्थिनींनी वर्गात गेले पाहिजे. प्राध्यापक वर्गातून निघून जाण्यापूर्वी विद्यार्थिनींनी वर्ग सोडता कामा नये.

५) तास नसतांना विद्यार्थिनींनी वऱ्हांड्यात किंवा पटांगणात फिरू नये. वाचनकक्षात व ग्रंथालयात वेळ कामी लावावा किंवा त्यांच्यासाठी असलेल्या कॉमन रुमध्ये बसावे.

६) निरनिराळ्या शैक्षणिक सवलती घेणाऱ्या विद्यार्थिनींनी दिलेली माहिती व आवेदन पत्रातील मजकूर सर्वस्वी त्यांनाच बंधनकारक राहील. सवलत रद्द झाल्यास नियमाप्रमाणे शुल्क देण्याचे बंधन विद्यार्थीनींवर राहील.

७) सभ्यता व शिष्टाचार यांचे कडक पालन करून संस्थेचा लौकिक वाढविण्याचे कार्य विद्यार्थिनींनी करावे.

८) महाविद्यालयात शुल्क व इतर दंड ताबडतोब भरला पाहिजे. अडचण असल्यास प्राचार्याकडे लेखी आवेदन पत्र सादर करावे.

९) महाविद्यालयात विवादात्मक प्रश्न उद्‌भवल्यास त्याबाबत प्राचार्यांना निर्णय सर्वांना बंधनकारक राहील.

१०) वह्या, पाठ्यपुस्तके वर्गात आवश्यक असणारे शैक्षणिक साहित्य विद्यार्थिनींजवळ असलेच पाहिजे. वर्गातील अभ्यास, गृहपाठ, परीक्षा इत्यादी बाबतीत विद्यार्थीनींचे वर्तन समाधानकारक असावे. विद्यापीठ परीक्षेकरिता विद्यार्थिनींची पात्रता ठरवितांना ही बाब अवश्य विचारात घेण्यात येईल.

११) महाविद्यालयाची मालमत्ता विद्यार्थिनींनी काळजीपूर्वक वापरावी. महाविद्यालयाच्या मालमत्तेची हेतु पुरस्पर केलेली हानी किंवा दुरूपयोग केल्यास याबद्दल दंड आकारण्यात येईल.

१२) सूचना फलकावरील सूचना नियमित पहाव्यात व त्यानुसार त्या सूचनांचे पालन करावे.

१३) महाविद्यालय परिसरात स्वच्छता राखावी, प्लास्टिकचा वापर करू नये.

१४) वर्गातच नव्हे तर महाविद्यालयाच्या परिसरात मादक पदार्थ, पान, तंबाखू, गुटखा, सिगारेट यांचे सेवन करता येणार नाही. महाविद्यालयातील स्वच्छता व विद्यार्थीनींच्या आरोग्याच्या दृष्टीने हे आवश्यक आहे.

१५) महाविद्यालयाच्या शिस्तीचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. महाविद्यालयाच्या आवारातील व बाहेरील अक्षम्य गैरवर्तणुकीकरिता विद्यार्थिनींस महाविद्यालयातून काढून टाकले जाऊ शकते.

१६) विद्यार्थिनींच्या व त्यांच्या पालकांच्या स्थानिक पत्यात तथा फोन नंबरमध्ये बदल झाल्यास कार्यालयात ताबडतोब कळविणे आवश्यक आहे.

१७) महाविद्यालयात मिळणाऱ्या कोणत्याही शिष्यवृत्ती व सवलतींना आपण पात्र आहोत हे ठरविण्याची जबाबदारी सर्वस्वी विद्यार्थिनींची व पालकांची आहे. त्याचप्रमाणे त्यासाठी करावयाचे अर्ज व आवश्यक कागदपत्रे वेळेवर देण्याची जबाबदारी विद्यार्थिनींची व पालकांची आहे.

१८) विद्यार्थिनींला महाविद्यालय सोडल्याचे मुळ प्रमाणपत्र दिल्यानंतर सहा महिन्याचे आत कोणत्याही सबबीखाली महाविद्यालय सोडल्याचे डुप्लीकेट प्रमाणपत्र मिळणार नाही. त्यानंतर रुपये २००/– शुल्क भरून डुप्लीकेट प्रमाणपत्र मिळेल. मूळ प्रमाणपत्र हरविले किंवा नष्ट झाले अशी प्राचार्याची खात्री पटल्याशिवाय डुप्लीकेट टी.सी. मिळणार नाही.

१९) विद्यार्थिनींनी महाविद्यालयातून प्राप्त केलेले ओळखपत्र स्वतःजवळ बाळगावे. ओळखपत्र सोबत नसल्यास केव्हाही महाविद्यालयातून बाहेर काढले जावू शकते.

२०) खालील बाबीवरून कोणत्याही विद्यार्थिनींचे नांव महाविद्यालयातून काढून टाकण्याचे किंवा त्यास शिक्षा करण्याचे अधिकार प्राचार्यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

अ) कॉलेजची देणी देण्यास असमर्थ ठरत असल्यास

ब) शैक्षणिक प्रगती व उपस्थिती कमी पडत असल्यास

क) विद्यार्थ्यांचे वर्तन असमाधानकारक असल्यास

ड) महाविद्यालयाच्या नियमांचे उल्लंघन करीत असल्यास

# प्रवेश पध्दतीबाबतचे नियम

आवेदन पत्रासोबत प्रवेश पध्दतीचा अवलंब करावा व त्यात नमुद केलेलीच कागदपत्रे किंवा प्रमाणपत्रे जोडावित.

१) महाविद्यालय सोडल्याचे मुळ प्रमाणपत्र आणि गुणपत्रिकेची झेरॉक्स चार प्रतीत.

२) विद्यार्थिनींने तत्पुर्वीची परीक्षा खाजगीरित्या दिली असल्यास बोर्ड किंवा विद्यापीठाचे अस्थायी प्रमाणपत्र (प्रोव्हिजन सर्टिफिकेट इन ओरीजनल) आणि तत्पूर्वीच्या परीक्षेची मूळ गुणपत्रिका व त्याची चार प्रतिलिपी.

३) आवेदन पत्रासोबत विद्यार्थीनीने पासपोर्ट आकाराची तीन छायाचित्रे मागील बाजूवर आपले नाव लिहून जोडणे आवश्यक आहे.

४) नागपूर विद्यापीठ या व्यतिरिक्त इतर बोर्ड किंवा विद्यापीठातून येणाऱ्या विद्यार्थिनींने मूळ क्षेत्रांतरण प्रमाणपत्र (मायग्रेशन सर्टीफिकेट) व त्याची सत्यप्रतिलिपी दोन प्रती प्रवेशाच्या वेळी देणे आवश्यक आहे.

५) ज्या विद्यार्थिनींनी नागपूर विद्यापीठ या व्यतिरिक्त इतर विद्यापीठाची पात्रता परीक्षा उत्तीर्ण केली. असेल अशा विद्यार्थिनींना नागपूर विद्यापीठातून (Eligibility Certificate) पात्रता प्रमाणपत्र प्राप्त करून दाखल करावे लागेल. हे प्रमाणपत्र विद्यापीठाच्या कार्यालयात दि. १५ सप्टेंबर पर्यंत पोहोचणे आवश्यक असल्यामुळे ते महाविद्यालयाच्या कार्यालयात दि. १ सप्टेंबर पर्यंत दाखल करण्यात यावे. मुदतीच्या आत प्रमाणपत्र दाखल न केल्यास विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे प्रतिमाह विलंब शुल्क आकारण्यात येईल. हे प्रमाणपत्र कार्यालयात (त्या बाबतचे दंडासहीत) दाखल होईलपर्यंत विद्यार्थीनींचा महाविद्यालयातील प्रवेश अस्थायी (प्रोव्हीजननल) राहील. तसेच महाविद्यालयाचा दंड प्रतिमाह ५०/– रू. राहील.

६) प्रवेश मिळालेल्या विद्यार्थिनींच्या याद्या वेळोवेळी सूचना फलकावर लागतील. अशा याद्यांत विद्यार्थिनींचे नांव न आल्यास तिला प्रवेश मिळाला नाही असे समजावे. प्रवेश मिळेपर्यंत कोणतीही विद्यार्थिनीं वर्गात बसू शकणार नाही.

**५) स्पर्धा व व्यवसाय मार्गदर्शन केंद्र**

वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षांबाबत माहिती देवून विद्यार्थिनींसाठी वर्ग आयोजित केले जातात तसेच व्यवसाय संबंधी मार्गदर्शनही केले जाते. इच्छुक विद्यार्थीनींनी या केंद्राच्या संबंधित प्राध्यापकांशी संपर्क साधावा.

* स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र व प्रशिक्षण केंद्र
* स्किल डेव्हलपमेंट सेंटर
* कॉम्प्युटर लॅब
* डिजिटल क्लासरुम व इंटरनेट सुविधा
* ई– लर्निंग रिर्सोसेस
* ऑनलाईन लेक्चर सुविधा

**६) क्रीडा विभाग (शारीरिक शिक्षण)**

सर्व विद्यार्थिनींना शारीरिक शिक्षण अनिवार्य आहे. शारीरिक शिक्षणासोबत देशी व विदेशी खेळांचे मार्गदर्शन केले जाते. नेहमी सराव करणाऱ्या विद्यार्थीनींना विद्यापीठ किंवा शासनाच्या विविध स्पर्धेत भाग घेता येतो. त्या संदर्भात विद्यार्थ्यांना विशेष गुण मिळत असतात.

**७) वैद्यकीय तपासणी**

विद्यापीठ नियमानुसार दरवर्षी प्रत्येक विद्यार्थिनींची वैद्यकीय चाचणी होणे आवश्यक आहे. वैद्यकीय चाचणी मोफत होत असते. या चाचणीमध्ये प्रत्येक विद्यार्थिनींच्या आजाराची माहिती होत असते. त्यानुसार त्यांना वेळेत उपचार घेणे शक्य होते. यामुळे दरवर्षी प्रत्येक विद्यार्थिनींने मोफत वैद्यकीय चाचणी चा लाभ घ्यावा.

७) प्रवेश मिळालेल्या विद्यार्थिनीस माहीती पुस्तिकेत नमूद केलेले सर्व शुल्क व निधी ताबडतोब भरावे लागेल. विद्यार्थिनीने स्वतःहून प्रवेश नाकारल्यास तिने भरलेली रक्कम कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाही.

८) कोणत्याही वर्गात दाखल होतांना विद्यार्थिनीने त्याबाबतची नियमानुसार स्वतःची पात्रता पारखून घ्यावी. कोणत्याही वर्गातील चुकीच्या प्रवेशासंबंधी संपूर्ण जबाबदारी सर्वस्वी विद्यार्थिनींवर राहील.

९) प्रवेश मिळवू इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींस प्राचार्य किंवा प्रवेश समितीपुढे मुलाखतीसाठी बोलविल्यास स्वखर्चाने यावे लागेल. अन्यथा प्रवेश न मिळाल्यास सर्व जबाबदारी विद्यार्थिनींची राहील.

१०) महाविद्यालयाकडून प्रवेश नाकारण्यात आल्यास आवेदन पत्रासोबत जोडलेली प्रमाणपत्रे प्रवेश नाकारल्यानंतर पंधरा दिवसात परत करण्यात येतील. प्रवेश मिळाल्यास एकदा भरलेली रक्कम परत मिळणार नाही.

११) कार्यालयाकडून विद्यार्थिनींला प्रमाणपत्रे, सवलतीचे अर्ज, शिक्षण शुल्क, विद्यापीठ परीक्षांचे अर्ज, निधी, दंड इत्यादी ज्या पावत्या व नोंदी मिळतील त्या काळजीपूर्वक ठेवाव्या. तसे न केल्यास रेकॉर्ड शोधण्यासाठी विद्यार्थीनीला कार्यालयात रु. ५०/– शोध शुल्क भरावे लागेल. इ.बी.सी. प्रमाणपत्र क्रमांक व स्कॉलरशीप मंजुरी क्रमांककरीता ५०/– रू. शुल्क भरावे लागेल.

१२) शैक्षणिक सत्रामध्ये महाविद्यालय सोडल्यास पूर्ण सत्राचे शुल्क भरावे लागेल. फक्त सरकारी नोकरीत असलेल्या पालकांच्या पाल्याची बदली झाल्यास त्याबाबत सुट देण्यात येईल.

१३) विद्यार्थिनींना आर्थिक सवलती, शिष्यवृत्ती यासाठी विहीत नमुन्यामध्ये विशिष्ट मुदतीत अर्ज सादर करावे लागतात. त्याबाबतची माहिती प्रवेश घेतेवेळीच विद्यार्थिनींने कार्यालयातून जाणून घेणे आवश्यक आहे. योग्यवेळी रीतसर व आवश्यक त्या कागदपत्रांसोबत अर्ज न दिल्यास शिष्यवृत्ती अथवा सवलत नामंजूर होण्याची शक्यता असते. शिष्यवृत्ती/सवलत नामंजूर झाल्यास पूर्ण शुल्क भरावे लागेल.

१४) फर्निचर मोडतोडीबाबत सर्वसामान्य दंड प्रत्येक विद्यार्थिनींवर आकारण्यात येईल.

# महाविद्यालयाची आकर्षणे

**१) समृद्ध ग्रंथालय**

महाविद्यालयात समृद्ध ग्रंथालय असून यामध्ये अनेक विषयांचे ग्रंथ उपलब्ध आहेत. ग्रंथालयात मान्यवर नागरीकांनी आपल्या खाजगी ग्रंथालयातील मौल्यवान पुस्तके भेट दिली आहेत. हुशार व होतकरू विद्यार्थिनींसाठी बुक–बँक योजना सुरू आहे. ग्रंथालयात एकावेळी एकच पुस्तक मिळेल. दिलेल्या मुदतीत पुस्तक परत करावे लागेल. पुस्तक उशिरा परत केल्यास मुदतीनंतर प्रती दिवस १ रु. प्रमाणे दंड आकारण्यात येईल व सर्व पुस्तक वितरणावर ग्रंथपालाचे नियंत्रण राहील. ग्रंथालयात स्वतंत्र वाचनकक्ष उपलब्ध आहे.

**२) ओळखपत्र**

महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर प्रत्येक विद्यार्थिनींला ओळखपत्र मिळेल. हे ओळखपत्र विद्यार्थीनीने नेहमी जवळ बाळगावे. त्यावर स्वतःचा फोटो व प्राचार्याची सही असणे आवश्यक आहे. ग्रंथालयातील पुस्तके, प्रयोगशाळेतील उपकरणे व खेळाचे साहित्य हे ओळखपत्र दाखविल्यानंतर मिळेल. ओळखपत्र हरविल्यास ५०/– रू. कार्यालयात भरून नवीन ओळखपत्र मिळू शकेल. प्रवेश मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत ओळखपत्र तयार करून घेणे आवश्यक आहे. ऑक्टोबर नंतर ओळखपत्र तयार केल्यास २५/– रू. दंड लागेल.

**३) राष्ट्रीय सेवा योजना**

विद्यार्थिनींच्या कर्तृत्वाला वाव मिळण्यासाठी आणि ग्रामीण भागातील सामुदायिक जीवनाशी एकरून होऊन त्यांचे सोबत काम करणे, श्रमाची प्रतिष्ठा वाढविणे त्याचप्रमाणे राष्ट्रीय कार्याला मदत करणे या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य महाविद्यालयात सुरू करण्यात आले आहे. ग्रामीण आरोग्य शिक्षण, ग्राम स्वच्छता, जल संवर्धन, पर्यावरण इत्यादी बाबीवर भर देऊन राष्ट्रीय सेवा योजना मार्फत दरवर्षी शिबीरे आयोजित केली जातात. विद्यार्थिनींनी या संधीचा फायदा घ्यावा. एन.एस.एस. मध्ये भाग घेणाऱ्या विद्यार्थीनींना विद्यापीठाकडून १०० पैकी गुण देण्यात येतात.

**४) महाविद्यालयीन वार्षिकांक 'उषःकाल'**

दरवर्षी महाविद्यालयाचे 'उषःकाल' हे वार्षिक प्रकाशित होते. यात मराठी, इंग्रजी, हिंदी भाषेतील लेख कविता व निबंध प्रकाशित होतात. वर्षभराचे वेगवेगळ्या मंडळाच्या कार्याचे इतिवृत्तही यात असते. यासाठी विद्यार्थिनींनी आपले साहित्य दि. ३० ऑक्टोबर पर्यंत संबंधीत विभाग प्रमुखांकडे द्यावेत.

### ८) शारीरिक कार्यक्षमता तपासणी

विद्यापीठ आदेशानुसार दरवर्षी प्रत्येक विद्यार्थिनींची शारीरिक चाचणी घेण्यात येते. चाचणी परीक्षेत 'अ' आणि'ब' अशी श्रेणी असते. ज्या विद्यार्थीनी या चाचणी परीक्षेत सर्वोत्कृष्ठ ठरतात त्यांना 'अ' श्रेणी व साधारण प्राविण्य मिळविणाऱ्यांना 'ब' श्रेणी मिळत असते. शारीरिक कार्यक्षमता चाचणीचे श्रेणीनुसार विद्यापीठाकडून प्रमाणपत्र देण्यात येते. शरीर सुदृढ ठेवण्यासाठी या चाचणीचा उपयोग होत असतो. त्यासाठी प्रत्येकाला ही चाचणी देणे अनिवार्य आहे. ज्या विद्यार्थिनींला चाचणीला गैरहजर राहतील त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येते.

### ९) युवा कक्ष (युवा जागर अभियान)

विद्यार्थिनींसाठी शिक्षण प्रशिक्षण व रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी युवा जागर अभियान आपल्या महाविद्यालयामध्ये सुरु आहे.

### १०) सांस्कृतिक विभाग

महाविद्यालयात शैक्षणिक गुणवत्ते बरोबर विद्यार्थीनींच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांना वाव देऊन त्यांच्या व्यक्तिमत्व विकासात भर घालण्याच्या उद्देशाने दरवर्षी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. विविध दिनविशेषाच्या निमित्याने थोर महापुरूषांचे विचार विद्यार्थिनींनी आत्मसात करावे हा हेतू या कार्यक्रमाचा असतो. तसेच संगीत स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, निबंध स्पर्धा, परिसंवाद, एकांकिका स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आदि घटकांवर आयोजित कार्यक्रमांचे आयोजन करून विद्यार्थिनींच्या सुप्त गुणांना चालना दिल्या जाते.

***

**बी.ए. - प्रथम वर्ष (राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार अभ्यासक्रम)**

१) इंग्रजी २) मराठी ३) समाजशास्त्र ४) इतिहास ५) अर्थशास्त्र

६) राज्यशास्त्र ७) मराठी वाङ्मय ८) इंग्रजी साहित्य

**NEP Subject Group**

**I Semester**

| Group - | Major | Open Elective (OE) | IKS | VSC | AEC | VEC | SEC |
|---|---|---|---|---|---|---|---|
| A | History | Economics | Major Related | Major Related | English | Environment | Skill Base Course |
| B | Political Science | History | | | | | |
| C | Sociology | Political Science | | | | | |
| D | Economics | Sociology | | | | | |
| E | Marathi | MLT | | | | | |
| F | English | ELT | | | | | |
| G | MLT | Marathi | | | | | |
| H | ELT | English | | | | | |

**II Semester**

| Group - | Major | Open Elective (OE) | Minor | VSC | AEC | VEC | SEC |
|---|---|---|---|---|---|---|---|
| A | History | Economics | Sociology | Major Related | Marathi | Indian Constitution | Skill Base Course |
| B | Political Science | History | Economics | | | | |
| C | Sociology | Political Science | History | | | | |
| D | Economics | Sociology | Political Science | | | | |
| E | Marathi | MLT | English | | | | |
| F | English | ELT | Marathi | | | | |
| G | MLT | Marathi | ELT | | | | |
| H | ELT | English | MLT | | | | |

**III Semester**

| Group - | Major | Open Elective (OE) | Minor | VSC |
|---|---|---|---|---|
| A | History | Economics | Sociology | Major Related |
| B | Political Science | History | Economics | |
| C | Sociology | Political Science | History | |
| D | Economics | Sociology | Political Science | |
| E | Marathi | MLT | English | |
| F | English | ELT | Marathi | |
| G | MLT | Marathi | ELT | |
| H | ELT | English | MLT | |

**IV Semester**

| Group - | Major | Open Elective (OE) | Minor | SEC |
|---|---|---|---|---|
| A | History | Economics | Sociology | Skill Base Course |
| B | Political Science | History | Economics | |
| C | Sociology | Political Science | History | |
| D | Economics | Sociology | Political Science | |
| E | Marathi | MLT | English | |
| F | English | ELT | Marathi | |
| G | MLT | Marathi | ELT | |
| H | ELT | English | MLT | |

**V Semester**

| Group - | Major | Major Elective (OE) | Minor | VSC |
|---|---|---|---|---|
| A | History | Major Subject Related | Sociology | Major Related |
| B | Political Science | | Economics | |
| C | Sociology | | History | |
| D | Economics | | Political Science | |
| E | Marathi | | English | |
| F | English | | Marathi | |
| G | MLT | Marathi | ELT | |
| H | ELT | English | MLT | |

**VI Semester**

| Group - | Major | Major Elective (ME) | Minor |
|---|---|---|---|
| A | History | Major Subject Related | Sociology |
| B | Political Science | | Economics |
| C | Sociology | | History |
| D | Economics | | Political Science |
| E | Marathi | | English |
| F | English | | Marathi |
| G | MLT | | ELT |
| H | ELT | | MLT |

## विद्यार्थिनींसाठी शैक्षणिक सवलती व शिष्यवृत्ती

**सूचना :** कोणत्याही विद्यार्थिनींला एका वेळी फक्त एकच शिष्यवृत्ती व सवलत घेता येईल. याबाबत कार्यालयात चौकशी करावी.

१) भारत सरकारची राष्ट्रीय शिष्यवृत्ती
२) भारत सरकारची राष्ट्रीय कर्जावू शिष्यवृत्ती योजना
३) प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या मुलींकरिता भारत सरकारच्या गुणवत्तेवर आधारित शिष्यवृत्ती.
४) बिगर हिंदी भाषिक प्रांतातील विद्यार्थीनींसाठी मॅट्रिक पुढील हिंदीच्या अभ्यासाकरिता शिष्यवृत्ती
५) स्वातंत्र्य संग्राम सैनिकांच्या मुलींसाठी मिळणाऱ्या शैक्षणिक सवलती, फी माफी, शिष्यवृत्ती आणि पुस्तकांसाठी अनुदान
६) आर्थिकदृष्टया मागासलेल्या पालकांच्या मुलींसाठी राज्य सरकारची फी सवलतीची योजना.
७) प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या मुलींकरिता राज्य सरकारची फी सवलतीची योजना.
८) सैनिकांच्या मुलींना राज्य सरकारची फी माफीची सवलत
९) अपंग शिष्यवृत्ती
१०) ई.बी.सी. सवलत
११) छत्रपती शाहू महाराज

## पालकांसाठी निवेदन

आपण आपल्या पाल्यांना शैक्षणिक प्रगतीची चौकशी करण्यासाठी प्राचार्यांना केव्हावी भेटू शकता. अशा जागरुक पालकांशी शैक्षणिक बाबींवर चर्चा करतांना आम्हाला आनंद होईल. आम्हाला पूर्ण विश्वास आहे की, आमच्या कार्याला पालकांचे सर्वतोपरी सहकार्य लाभून संस्था उत्तरोत्तर प्रगती पथावर वाटचाल करीत राहील.

## स्कॉलरशिपसाठी लागणारे कागदपत्र

### B.A.I, II, III

१) वर्ग १२ वी टि.सी. झेरॉक्स
२) वर्ग १२ वी मार्कशिट झेरॉक्स
३) वर्ग १० वी मार्कशिट झेरॉक्स
४) वर्ग ११ वी मार्कशिट झेरॉक्स
५) जात प्रमाणपत्र झेरॉक्स
६) ओरीजनल इन्कम सर्टीफिकेट
७) डोमेसाईल सर्टिफिकेट झेरॉक्स
८) आधार कार्ड झेरॉक्स
९) राशन कार्ड झेरॉक्स
१०) पासबुक झेरॉक्स
११) पासपोर्ट फोटो
१२) गॅप असल्यास सर्टिफिकेट (ओरीजनल)
१३) स्कॉलरशीप ऑर्डर नंबर (ओरीजनल)
१४) एस.टी. करिता जातवैधता प्रमाणपत्र
१५) पालकांचा आधारकार्ड (आई/वडील)
१६) OBC, SBC, VJNT करिता नॉनक्रिमीलेयर सर्टिफिकेट झेराक्स
१७) B.A.II करिता I Sem, II Sem मार्कशीट झेराक्स
१८) B.A.II करिता I Sem, II Sem, III Sem, IV Sem मार्कशीट झेराक्स

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
## परिपत्रकानुसार वरिष्ठ महाविद्यालयासाठी सत्र २०२६-२०२७ करीता
## खालील प्रमाणे प्रवेश शुल्क द्यावे लागेल.

